प्रबोधन

गोरेगाव

# चोविसावा वार्षिक अहवाल

## १९९६-९७

# प्रबोधन, गोरेगाव

## प्रबोधन क्रीडाभवन

सिद्धार्थ नगर, गोरेगांव (प.), मुंबई ४०० १०४.

## २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

'प्रबोधन गोरेगाव' या संस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १७ जानेवारी १९९८ रात्री ९.०० वाजता, प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाजे :**

१. प्रास्ताविक

२. सन १९९५-९६ सालच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजूरी देणे.

३. १९९६-९७ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूरी करणे.

४. नवीन वर्षाकरिता (१९९७-९८) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून
पांडुरंग पोखरकर
कार्याध्यक्ष
डॉ. मनोहर अदवानकर
प्रमुख कार्यवाह

दि. २५ ~~ऑक्टोबर~~ डिसेंबर १९९७
गोरेगाव, मुंबई, ४०० १०४

---

१) संस्थेचा जमाखर्च अवलोकनार्थ प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थनगर, गोरेगांव (प.), मुंबई ४०० १०४, येथील संस्थेच्या कार्यालयात ११-१-९८ ते १४-१-९८ पर्यंत रोज सायंकाळी ६ते ७ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक १४-१-९८ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. १४-१-९८ पूर्वी संस्था कार्यालयात संध्या. ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# 'प्रबोधन गोरेगाव'

## वार्षिक अहवाल
## १९९६-१९९७

'प्रबोधन-गोरेगाव' या संस्थेच्या २४ व्या वर्षाचा अहवाल संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना आम्हांस अत्यानंद होत आहे. या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारिणीच्या एकूण २० सभा झाल्या. त्या सभांना सरासरी उपस्थिती १२ होती. संस्थेच्या कार्यकारिणीच्या सभासदांची संख्या स्वीकृत सभासदांसह २० होती.

**रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त थोडेसे**

माननीय श्री. सुभाष देसाई यांचे समर्थ नेतृत्व आणि निश्चित विचार घेऊन गोरेगावातील समविचारी तरुण मंडळींनी एका ध्येयाने प्रेरीत होऊन सतत कार्यरत रहाण्याची शपथ घेतली आणि 'प्रबोधन गोरेगाव' या संस्थेची स्थापना केली. अशा तऱ्हेने पंचवीस वर्षांपूर्वी मराठी वर्षाच्या प्रथम दिनी, गुढीपाडव्याला 'प्रबोधन-गोरेगाव' संस्थेची स्थापना झाली.

१६ मार्च १९७२ रोजी क्रीडा व कलेची जोपासना, ज्ञानाचा प्रसार आणि समाजसेवा या त्रिसूत्रीचा आधार घेऊन ही मंडळी कामाला लागली. ज्ञान-कला-सेवेच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली ती नाट्यमहोत्सवाने. या महोत्सवाचा उद्देश निव्वळ निधी उभा करणे हा न ठेवता गोरेगावकरांना चांगली दर्जेदार नाटके पहावयास मिळावी असाही 'प्रबोधन'चा प्रयत्न होता. रंगावली स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, विद्यार्थ्यांना मार्गदर्शक अशी एस. एस. सी. व्याख्यानमाला, नवविचारांचे स्वागत करणारी व विविध क्षेत्रातील थोरामोठ्यांचे विचार मिळवून देणारी 'प्रबोधन व्याख्यानमाला' या सारख्या कार्यक्रमांनी 'प्रबोधन' कडे गोरेगावकर आकृष्ट झाले. संस्थेने गोरेगावातील बुद्धीमान विद्यार्थ्यांचे कौतुकही केले. 'प्रबोधन'च्या स्थापनेनंतर चवथ्याच वर्षी बाविसाव्या मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाचे शिवधनुष्य संस्थेने अतिशय यशस्वीपणे उचलले. प्रबोधनचा प्रत्येक कार्यकर्ता रात्रंदिवस झटला. पाहुण्यांच्या आदरातिथ्यात कोणतीही कमतरता ठेवली नाही. साहित्यिकांना, प्रेक्षकांना संमेलन भावले ते इतके की, संमेलनाध्यक्ष श्री. रणजित देसाई यांना असे म्हणावेसे वाटले की, ''मलाही प्रबोधनचा स्वयंसेवक करुन घ्या,'' यातच प्रबोधन कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे चीज झाले.

गेल्या पंचवीस वर्षात 'प्रबोधन'ने आखलेला प्रत्येक कार्यक्रम हा त्या त्या क्षेत्रातील महत्वाचा टप्पा ठरला. संस्थेचे नाव गोरेगाव पुरते मर्यादित न रहाता महाराष्ट्रभर होण्यासाठी राज्यस्तरीय वक्तृत्वस्पर्धा, राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा, राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे संस्थेने यशस्वी आयोजन केले. आता प्रबोधनच्या 'प्रोजेक्ट २०००' या प्रकल्पामुळे जगात भारताचे आणि भारतात प्रबोधनचे नाव वेगळ्याच संदर्भात उच्चारले जाईल याबद्दल आमच्या मनात संदेह नाही.

बाल वाचनालय, १९८१ चा बाल चित्रपट महोत्सव, १९८६ साली स्त्रियांसाठी आयुर्वेद अभ्यासवर्ग, १९८८ सालचे 'चित्रमय जपान' हे जपानची सर्वांगीण माहिती देणारे प्रदर्शन, आबाल वृद्धांसाठी योगाभ्यास वर्ग, वृक्षदिंडी, प्रबोधन आंतर शालेय क्रीडा महोत्सव यासारखे कार्यक्रम प्रबोधनने

एस्. एस्. नायक
सनदी लेखापाल
बोटावाला बिल्डिंग, १ ला मजला,
७/१०, हार्निमन सर्कल.
मुंबई-४०० ०२३.

# प्रबोधन गोरेगाव

**धर्मादाय विश्वस्त संस्था नों. क्र. एफ्-२५०२ (बॉम)**

## सनदी लेखापालांचा अहवाल

प्रबोधन गोरेगाव संस्थेचे ३१ मार्च १९९७ ला पूर्ण होणाऱ्या वर्षाचे हिशेब आम्ही तपासले असून त्यासंबंधात पुढील माहिती देत आहोत.

१) क्रीडाभवनाच्या बांधकामापोटी बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय असलेल्या उर्वरित २५% रकमेची तरतूद हिशेबात करण्यात आलेली नाही कारण सदर रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेली नाही. वा कळविलेली नाही.

२) क्रीडाभवनासंबंधातील देय महानगरपालिकेचे कर यांची तरतूद हिशेबात करण्यात आलेली नाही कारण करसंबंधातील रक्कम संस्थेने विवाद्य मानली आहे

३) वरील मुद्दे गृहीत धरून असे म्हणता येईल की,

**संस्थेने**

(ओ) हिशेब नियमितपणे व संबंधित कायदा व नियम यानुसार ठेवलेले आहेत.

(बी) आय आणि व्यय योग्य व बिनचुक पद्धतीने हिशेबात दाखविले आहेत.

(सी) खजिनदाराच्या ताब्यातील गंगाजळी व खर्चाच्या पावत्या हिशेब तपासणीच्या दिवशी हिशेब पत्रकाशी सुसंगत होत्या.

(डी) सर्व पुस्तके, करार, हिशेब, खर्चाच्या पावत्या व अन्य कागदपत्रे आम्हास दाखविण्यात आली.

(इ) जंगम मालमत्तेची नोंद योग्य रित्या ठेवलेली होती त्यातील बदल वेळोवेळी कळविले होते.

(एफ) आमच्या आवश्यकतेनुसार कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहिले व आवश्यक माहिती त्यांनी दिली.

(जी) संस्थेचा कोणताही निधी किंवा मालमत्ता संस्थेच्या उद्दिष्ट किंवा ध्येयांव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी वापरण्यात आलेला नाही.

(एच) एका वर्षापेक्षा अधिक काळ कोणतेही देणे संस्थेने बाकी ठेवलेले नाही. कोणतीही रक्कम बुडीत मानलेली नाही.

(आय) रू ५०००/- पेक्षा अधिक किंमतीच्या बांधकाम व दुरुस्ती खर्चासाठी निवीदा मागवण्यात आलेली नाही

(जे) धर्मादाय संस्थेची कोणतीही रक्कम कलम ३५ च्या विरोधात गुंतविण्यात आलेली नाही.

(के) स्थावर मालमत्तेचा कोणताही विनियोग कलम ३६ च्या विरोधात केलेला आम्हास आढळला नाही.

(एल) नियमबाह्य, बेकायदेशीर व अयोग्य खर्च किंवा संस्थेस येणे असलेली रक्कम वा अन्य मालमत्ता जमा करण्यामध्ये अपयश वा नकार संस्थेच्या बाबतीत आढळला नाही.
त्याचप्रमाणे निधीचा अपव्यय किंवा नुकसान संस्थेने केलेले नाही.

(एम) अंदाजपत्रक नियम १६-अ प्रमाणे दर्शविलेल्या नमुन्यात सादर केलेले नाही.

(एन) कार्यकारिणी सदस्यांची लघुतम व महत्तम संख्येची तरतूद पाळण्यात आली आहे.

(ओ) नियमानुसार नियमितपणे सभा घेण्यात आल्या आहेत.

(पी) सभांची इतिवृत्ते लिहिण्यात आली आहेत.

(क्यू) कार्यकारिणी सदस्यांपैकी कोणाचाही संस्थेच्या गुंतवणुकीशी संबंध नाही.

(आर) कोणीही कार्यकारिणी सदस्य संस्थेचा धनको वा ऋणको नाही.

(एस) मागील वर्षीच्या कागदपत्रांमध्ये आम्ही कोणतीही नियमबाह्यता दर्शविली नव्हती.

(टी) धर्मादाय उपायुक्तांचे किंवा धर्मादाय सहआयुक्तांचे लक्ष वेधण्यासारखी कोणतीही विशिष्ट बाब आहे असे आम्हास वाटत नाही.

मुंबई
दि. १६ सप्टेंबर १९९७

सही
(सनदी लेखापाल)

# प्रबोधन गोरेगाव

**कार्यालय :** प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४
दूरध्वनी : ८७३ ४८ ६९

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था *(Regn. No. Mum. 46/72 GB BSD)* मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था *(Regn. No. F 2502 Mum.)*

१९९६-९७

अध्यक्ष : **श्री. बसंत ताबडे** बी.ए.
उपाध्यक्ष : **श्री. गिरीश देसाई** डी.सी.ई.
**श्री. श्रीनिवास शिरसेकर** जी.डी. आर्ट

## कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : **श्री. पांडुरंग पोखरकर** बी.एससी.
प्रमुख कार्यवाह : **डॉ. मनोहर अदवानकर** एम.एससी. पीएच.डी.
**सहकार्यवाह** : **श्री. नितीन शिंदे** बी.ए. डी.जे.
**श्री. ~~नितीन~~ सतीश त्रैलोक्य** बी.एससी.
खजिनदार : **श्री. महादेव खानोलकर**

## सभासद

**श्री. विलास देवरुखकर** बी.एससी. (ऑ.)
**श्री. दिनकर मालवणकर**
**श्री. चंद्रकांत पोतदार**
**श्री. मिलींद डुंबरे** बी. कॉम.
**श्री. भूषण काळे**
**श्री. राधाकृष्ण भट**

**श्री. पद्माकर देसाई** बी. एससी. (ऑ.)
**ॲड. विकास रेळे** बी.ए., एलएल. बी.
**श्री. चंद्रकांत देऊलकर**
**श्री. सुरेश चव्हाण** बी.ए.
**श्री. सुधीर मिठबावकर** बी.एससी., बी.एड.
**श्री. सुनिल कविश्वर**
जेकब ऑन्द्रन

## अंतर्गत हिशेब तपासनीस

**श्री. रवींद्र नाखरे** बी. कॉम. डी.एफ.एम.

## सनदी लेखापाल

**मे. एस्. एस्. नायक आणि कं.**